**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**पुणे वृत्तांत**
**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 24.06.2025** **वार-मंगळवार**

---

**<u>राममोहननायडू</u>**

हेलिकॉप्टर आणि लहान विमानांची मागणी वाढल्यानं त्यांच्या उत्पादनाला चांगला वाव आहे; असं केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री के राममोहन नायडू यांनी आज पुण्यात सांगितलं. सध्या देशात 162 विमानतळ असून 2047पर्यंत देशातील विमानतळांची संख्या साडेतीनशेपर्यंत जाईल; त्यामुळे विमानं आणि हेलिकॉप्टर्सची संख्याही वाढणार असल्याचं नायडू म्हणाले. राज्य शासनानं फिक्कीच्या सहकार्यानं आयोजित केलेल्या एका परिषदेत ते बोलत होते. हेलिकॉप्टर आणि लहान विमान निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी आणि उद्योजक यात सहभागी झाले होते. हवाई वाहतूक क्षेत्राचा विकास, विस्तार, सुरक्षितता, भविष्यातील ध्येयधोरणे, कुशल आणि तंत्रशुद्ध मनुष्यबळ निर्मिती, थेट परकीय गुंतवणुकीच्या संधी यासह विविध पैलूंवर या परिषदेत विचार मंथन झालं.

**<u>पुणेमनपा</u>**

केंद्र आणि राज्य सरकारच्या अनुदानातून पुणे महापालिका ओल्या कचऱ्यापासून ‘बायो-सीएनजी’ बनवणारा नवा प्रकल्प उभारणार आहे. दररोज सुमारे 300 टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता असलेला हा प्रकल्प खासगी ठेकेदारामार्फत शहराबाहेर उभारण्याचा प्रस्ताव आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान दोनच्या धर्तीवर राज्यातही स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबवलं जात आहे. सर्व शहरं कचरामुक्त करण्याचं या अभियानाचं मुख्य उद्दिष्ट आहे. त्याअंतर्गत शहरातील सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचं शास्त्रोक्त व्यवस्थापन, शाश्वत स्वच्छता आणि वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करण्याचा हा प्रकल्प आहे. या संदर्भात पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या प्रस्तावाला नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

**भूसंपादन**

पुणे शहराच्या दक्षिण भागातील वाहतूक सुधारण्यासाठी कात्रज – कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचं काम सुरू असून या रस्त्याच्या भूसंपादनासाठी राज्य सरकारनं 140 कोटी रुपयांचा निधी दिला आहे; मात्र यातील केवळ  9 कोटी 57 लाख रुपये खर्च झाले आहेत. या रस्त्यासाठी सुरू असलेली संयुक्त मोजणी तसंच त्यासाठीच्या तांत्रिक मान्यतांना उशीर होत असल्यामुळे हे भूसंपादन रखडलं आहे.

**pcmc**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरत डेंग्यू, मलेरिया आणि इतर आजारांच्या रुग्णांची संख्या वाढत आहे; त्यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागानं या आजारांच्या प्रतिबंधासाठी एक विशेष बैठक नुकतीच बोलावली होती. डासांची उत्पत्तीस्थानं शोधण्यासाठी घरांची, भंगारच्या दुकानांची, सार्वजनिक ठिकाणांची तपासणी करणं, नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाई करणं, औषध फवारणी करणं असे विविध निर्णय यावेळी घेण्यात आले. त्यानुसार आतापर्यंत सुमारे 2 लाख घरं आणि आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून 1,292 नोटीसा बजावण्यात आल्या आहेत; तसंच 3 लाख 36 हजार  रुपयांचा दंडही वसूल करण्यात आला आहे.

**पुणेजीबीएस**

पुण्यात जानेवारी महिन्यात गुलेन बॅरी सिंड्रोम म्हणजे जीबीएस या आजाराचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला होता; आता हा प्रादूर्भाव संपुष्टात आला असला तरी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जोखीमग्रस्त भागातील पिण्याच्या पाण्याची तपासणी करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य विभागानं महापालिकेला दिल्या आहेत.

**पुरवणीपरीक्षा**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या  दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षांना आजपासून सुरुवात झाली. इयत्ता दहावीचे 34 हजार 562 आणि इयत्ता बारावीचे 68 हजार 98 विद्यार्थी ही परीक्षा देत आहेत.

**पुरस्कार**

महालक्ष्मी आधार फाउंडेशनच्या वतीने भारतीय संविधान जनजागृती अभियाना अंतर्गत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा राष्ट्रीय समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्यामध्ये पुण्याचे आंतरराष्ट्रीय हॉकी पंच आणि प्रशिक्षक श्रीधरन तांबा मारी आणि ज्येष्ठ क्रीडा पत्रकार डॉक्टर मिलिंद ढमढेरे यांचा समावेश होता. सह्याद्री ट्रेकर्सचे संस्थापक संजय पारठे,, आंतरराष्ट्रीय योगतज्ञ उमा चौगुले,  समाजसेविका आम्रपाली मोहिते यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

**धरण**

पुणे आणि परिसरात काल रात्रभर सुरू असलेल्या संततधार पावसामुळे खडकवासला धरणाच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण असून अधून मधून पावसाच्या हलक्या सरी पडत आहेत. आज कमाल तापमान 30 आणि किमान तापमान 20 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही आकाश ढगाळ राहून हलका पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**